# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/ ७६ /सन २०१५ दि. ०२/०१/२०१५

**वाचावे :** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११ सप्टेंबर २०१४
४. या कार्यालयाचे आदेश क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/५४९/सन २०१४ दि. १०/१०/२०१४

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दि.१३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतुद आहे, आणि,

ज्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे, आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११/०९/२०१४ अन्वये अधिसुचीत करण्यात आलेले आहेत, आणि सदर नियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी नियम क्र.२(८) नुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची व्याख्या करण्यांत आलेली आहे,आणि,

ज्याअर्थी, राज्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी नियुक्त करणे क्रमप्रापत आहे.

त्याअर्थी, राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय / शिखर संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी वाचावे क्र. ४ चे आदेशात खालीलप्रमाणे बदल करुन राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणूक नियमातील नियम ३(i) अन्वये प्राप्त अधिकारास अनुसरुन खालील प्रमाणे स्तंभ २ मधील अधिकारी यांची स्तंभ ३ मधील संस्थांच्या निवडणूकांसाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई | मुंबई विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (दुग्ध वगळून) |
| २. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई | कोकण विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (दुग्ध वगळून) |

| | | |
|---|---|---|
| ३. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे | पुणे विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (दुग्ध वगळून) |
| ४. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | कोल्हापूर विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (दुग्ध वगळून) |
| ५. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक | नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (दुग्ध वगळून) |
| ६. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | औरंगाबाद विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (दुग्ध वगळून) |
| ७. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातुर विभाग, लातुर | लातूर विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (सर्व दुग्ध सहकारी संघ वगळून) |
| ८. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती विभाग, अमरावती | अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (दुग्ध वगळून) |
| ९. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर विभाग, नागपूर | नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका व सर्व राज्यस्तरीय संघीय/शिखर सहकारी संस्था (दुग्ध वगळून) |
| १०. | सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) म.रा. मुंबई | सर्व राज्यस्तरीय /शिखर दुग्ध सहकारी संस्थांपुरते मर्यादित |

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशानूसार**

**( डॉ.ए.बी.जोगदंड )**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

प्रत माहितीस्तव :

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीस्तव सस्नेह

१. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे
४. मा.आयुक्त (दुग्धविकास), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस , वरळी मुंबई
५. मा.संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर.